मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा घटक)

Mumbai Housing And Area Development Board

उपमुख्य अधिकारी (पणन) यांचे कार्यालय

कक्ष क्र. 240 (पणन) पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा), कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई -400051

---

दिनांकः 04/09/2023

## तात्पुरते देकार पत्र (Provisional Offer Letter)

(Form - II)

[See Regulation 17 (I)]

प्रति,

श्री/श्रीमती,

AKSHATA NIVRUTTI NALAVDE

D/O NIVRUTTI NALAVDE BUILDING NO 2C, FLAT NO 105, NEW MHADA COLONY SADHU T.L.VASWANI ROAD, CUFFE PARADE MUMBAI MUMBAI CITY MAHARASHTRA 400005

विषयः - **मुंबई मंडळ, म्हाडा सोडत मार्च-2023 संकेत क्रमांक 412 योजनेतील सदनिका वितरणाचे तात्पुरते देकारपत्र. [प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)]**

संदर्भ : - 1-आपला अर्ज क्र. 1130011342 प्रवर्ग .GP प्राधान्य क्र. 162

2- दिनांक 17/08/2023 रोजीचे आपले स्विकृती पत्र व इतर कागदपत्रे.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मुंबई मंडळाची सोडत-2023 मध्ये आपण यशस्वी अर्जदार आहात. याअनुषंगाने आपणास प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) योजनेच्या संकेत क्र. 412 अंतर्गत असलेल्या इमारत क्र. 2, विंग C मजला 9 सदनिका क्र. 908 चे वितरणासाठी तात्पुरते देकार पत्र (Provisional offer Letter) देण्यात येत आहे

## 1. आपणांस वाटप करण्यात येणा-या सदनिकेचा तपशिल पुढीलप्रमाणे :

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

| | | |
|---|---|---|
| 1.1 | योजनेचे नाव | 412-PAHADI GOREGAON, W MUMBAI- 104-EWS |
| 1.2 | संकेत क्रमांक | 412 |
| 1.3 | सदनिका क्रमांक | इमारत क्र. 2, विंग C मजला 9 सदनिका क्र. 908 |
| 1.4 | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ | 29.99 चौ.मी. |
| 1.5 | सदनिकेची अंदाजित विक्री किमंत | रु. 3044000/- |
| 1.6 | सदनिकेची विक्री किमंत Online भरण्याची पध्दत | अर्जदारांनी संकेत स्थळावरील खात्यावर user ID व Password टाकून Login केल्यावर ऑनलाईन पध्दतीने सदनिकेची खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार / पती/पत्नी यांचे बॅक खात्यामधुन विहीत मुदतीत NEFT/RTGS/Net Banking/UPI/Debit Card/Credit Card इत्यादी द्वारे रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक आहे. |

Nalavde

**2. सदनिकेची किंमत भरण्याचा कालावधी / टप्पे :-**

2.1. आपणास वाटप करण्यात येत असलेल्या सदनिकेची अंदाजित विक्री किमंत खालील टप्पे निहाय व विहित मुदतीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्जदार पती/पत्नी यांचे बँक खात्यामधुन NEFT/RTGS/Net Banking/UPI/Debit Card/Credit Card इत्यादी द्वारे रक्कमेचा भरणा करावयाची आहे.

| टप्पा | भरावयाची रक्कम | मुदत |
|---|---|---|
| 1 | सदनिकेच्या एकूण किंमतीच्या 25 % रक्कम | तात्पुरते देकार पत्र लॉगिन मध्ये उपलब्ध करून दिलेल्याच्या दिनांकापासून 45 दिवसांच्या आत रक्कम भरावयाची आहे. |
| 2 | उर्वरित 75 % रक्कम | टप्पा 1 च्या मुदतीनंतर पुढील 60 दिवसांत |

टप्पा 1- प्रथम टप्प्यातील 25% रक्कम रु. 751000/- (अनामत रक्कम वजा करून येणारी रक्कम) भरणे बंधनकारक आहे.भरणा करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 45 दिवसांनंतर) द.सा.द.शे. नियमाप्रमाणे व्याज (म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार) आकारणीच्या अधीन राहून 15 दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल.या कालावधीतही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 60 दिवसांत) प्रथम टप्प्यातील 25% रक्कम न भरल्यास सदनिकेचे वितरण कोणतीही पुर्व सुचना न देता रदद केले जाईल.

टप्पा 2- टप्पा 1 च्या मुदतीनंतर पुढील 60 दिवसांत सदनिकेची उर्वरित 75 टक्के रक्कम रु. 2283000/- भरणे बंधनकारक आहे. या कालावधीतही (75% रक्कमेकरीताचे 60 दिवस) अर्जदाराने 75% रक्कम भरणा न केल्यास, 105 दिवसांचा विहित कालावधी संपुष्टात आल्यानंतर द.सा.द.शे. नियमाप्रमाणे व्याज (म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार) दराने व्याज आकारणीच्या अधिन राहून अर्जदारास अधिकतम 90 दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल.यानंतरही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 195 दिवसांत) सदनिकेची किंमत अदा करण्यात अर्जदाराने कसूर केल्यास किंबहुना न भरल्यास तात्पुरते देकारपत्र तात्काळ रदद करण्यात येईल.

2.2 अर्जदाराचे तात्पुरते देकारपत्र रदद झाल्यानंतर अर्जदाराने भरणा केलेल्या रक्कमेतुन सदनिकेच्या किंमतीच्या 1% एवढी रक्कम समपहरण (Forfeit) करुन उर्वरित रक्कम विना व्याज अर्जदाराच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल तथापी, अर्जदाराला तात्पुरते देकार पत्र दिल्यानंतर सदनिकेच्या विक्री किंमतीपैकी निरंक रक्कमेचा भरणा केलेला असल्यास व सदनिकेचे वितरण रदद झाल्यास उपरोक्त समपहरण करावयाची रक्कम अनामत रक्कमेपेक्षा जास्त भरल्यास, अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येणार नाही.

2.3 ज्या अर्जदारांना सदनिकेची 100% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रक्कमी) भरावयाची आहे, असे अर्जदारांना तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 45 दिवसांच्या आत सदनिकेची 100% रक्कम भरणे आवश्यक आहे.

2.4 सदनिकेच्या विक्री किमंतीचा भरणा करण्यासाठी लाभार्थीला वित्तिय संस्थेकडून गृहकर्ज घ्यावयाचे असल्यास अशा अर्जदारांनी वित्तिय संस्थेचे कर्ज पुर्व मान्यता पत्रासह (Pre-Sanction Letter) ना-हरकत दाखल्यासाठी अर्ज Online सादर करावयाचा असून अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना तात्काळ ना-हरकत दाखला मंडळाकडून देण्यात येईल तथापी, अर्जदाराला सदनिकेच्या विक्री किमंतीच्या 25% रक्कम भरणे बंधनकारक असेल या पश्चातच वित्तीय संस्थेच्या नावे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

2.5 अर्जदार किंवा त्याचे पती / पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात / विविध संकेतामध्ये अर्ज केल्यास व त्याचे विविध प्रवर्गात / विविध संकेतांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडती मध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गामध्ये / सकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असेल तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल.अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जासाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज रु. 1000/- इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट करुन परतावा करण्यात येईल.

Signature Not Verified
Rajendra Gangadhar Gaikwad
Dy.CO (Marketing)/MB

Nalawade

2.6 सदनिकेची संपुर्ण रक्कम मंडळाच्या खात्यामध्ये जमा झाल्यानंतरच सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देण्यात येईल.

2.7 सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने सादर केलेले कागदपत्र/पुरावे / दाखले मुळ प्रती पडताळणीसाठी मागणी केल्यास त्या आपणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मुळ प्रती सादर करणे बंधनकारक असेल त्यामध्ये कसुर केल्यास अथवा सादर केलेली कागद पत्र / पुरावे / दाखले बनावट किंवा चुकीची माहीती दिली असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अर्जदारावर कायदेशीर कार्यवाही करुन सदनिका ताब्यात घेण्यात येईल व भरणा केलेली विक्री किंमत संपूर्ण समपहरण/ Forfeit केली जाईल.

**3. सदनिकेच्या किंमती व्यतिरिक्त पुढील रक्कम अदा करावी लागेल.**

3.1 नियमानुसार सदर सदनिकेच्या किंमतीपोटी भराव्या लागणा-या रकमेवर महाराष्ट्र शासनाचे योग्य ते मुद्रांक शुल्क व नोंदणी फी संबंधीत खात्याकडे भरावी लागेल.

3.2 सदनिकेचे 12 महिन्याचे आगाऊ सेवाशुल्क एकत्रीतरित्या भरणे बंधनकारक राहिल यापश्चात सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

3.3 शासनाच्या धोरणानुसार / अधिसूचनेनुसार मंडळाने विक्रीकरीता काढलेल्या सदनिकेस विक्री किंमती व्यतिरिक्त वस्तु व सेवा कर (Goods & Service Tax) / देखभाल खर्च लागू झाल्यास सदर कर अर्जदारांना संबंधित कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक राहील.

3.4 सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती/अंदाजित असून मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा अधिकार राहील. सदनिकेची विक्री किमंतीमध्ये वाढ झाल्यास वाढीव किमंत अर्जदारांना विना अट भरणे बंधनकारक असेल.

4. यशस्वी अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबापत्र अर्जदार व त्याची पती/पत्नी या दोघांच्या नावे करण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र शासन पत्र क्र. न्यायाप्र-2015/प्र.क्र.168/गृनिभू/ गृनिवि, दि.24/09/2015 अन्वये संयुक्त नावे वितरण व ताबा करण्यात येईल.

5. सदनिका वाटप झाल्यानंतर सदनिकाधारकांनी तीन महिन्याच्या आत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन सहकारी संस्था अधिनियम 1960 अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करावी लागेल. सदनिकेच्या पाणीपुरवठा, जलनिसारण, बाह्यविद्युत पुरवठा, इत्यादी सुविधांची देखभाल व दुरुस्तीही कामे सहकारी संस्थेकडे घ्यावी लागेल.महानगरपालिकेचे / नगरपालिकेचे सर्व प्रकारचे कर संबंधित गृहनिर्माण संस्थेने त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील. तसेच म्हाडा मिळकत व्यवस्थापन विनियम 1981 मधील विनियम 21 नुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीचे अभिहस्तांतरण करुन घेणे आवश्यक आहे.

6.सदनिकेचा ताब्यात घेतल्यानंतर सदनिकेच्या कसल्याही प्रकारची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी मंडळाची राहणार नाही.

7. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम, 1981 भाग-3 विनियम - 19 अन्वये अर्जदाराने सोडतीसाठी अर्ज भरताना वारसाचे नाव नामनिर्देशित केले आहे. सदनिका वितरणापुर्वी दुर्देवाने अर्जदाराचा मृत्यू झाल्यास सदर सदनिकेचा ताबा देणेबाबत पुढील कार्यवाही नामनिर्देशित वारसाचे नावे करण्यात येईल.सोडतीपश्चात अथवा सदनिकेची रक्कम भरुन घेण्यासाठी देण्यात आलेल्या तात्पुरते देकारपत्रानंतर अर्जदाराचा मृत्यू झाल्यास त्यांचे नामनिर्देशित वारसदारास सदनिकेची रक्कम तात्पुरत्या देकार पत्रातील मुदतीनुसार अदा करणे आवश्यक राहील. सदनिकेची रक्कम विहीत मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यास सदनिकेचे वितरण रद्द समजण्यात येईल व प्रतिक्षायादी वरील अर्जदाराला संधी देण्यात येईल. त्याच बरोबर अर्जदाराने वारसाचे नाव नामनिर्देशित न केल्यास आणि वितरणापुर्वी अर्जदाराचा मृत्यु झाल्यास प्रतिक्षायादी कार्यान्वित करण्यात येईल.

Signature Not Verified
Rajendra Gangadhar
Gaikwad
Dy.CO (Marketing)/MB

Nalawade

8. गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्रमांक लोआप्र-1109/प्र.क्र.349/गृनिभू-1 दिनांक 07.05.2010 अन्वये म्हाडा अंतर्गत अनुसूचित जाती नवबौध्दांसह, भटक्या जमाती/विमुक्त जाती प्रवर्गातील व्यक्तींना वितरीत करण्यात येणा-या गाळे/सदनिकांचा ताबा देण्यापुर्वी संबंधित लाभार्थ्याने जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) सादर केल्याशिवाय त्यास गाळे/सदनिकांचा ताबा देण्यात येवू नये असे निर्देशित असल्याने सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी अनुसूचित जाती नवबौध्दांसह, भटक्या जमाती/विमुक्त जाती या प्रवर्गात अर्जदार मोडत असलयाबाबतचे सक्षम प्राधिका-याने दिलेले जात वैधता (Caste Validity Certificate) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सदर प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी अहवाल संबंधित समितीद्वारे प्राप्त झाल्यानंतर अर्जदारांना प्रत्यक्ष सदनिकेचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

9. आदिवासी विकास विभाग,महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्रमांक एसटीसी-1008/प्र.क्र.151/का.10 दिनांक 12 जानेवारी, 2009 3अन्वये मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ (म्हाडा) किंवा इतर सार्वजनिक प्राधिकंरणाअंतर्गत गाळे निवासस्थान वितरीत करतांना अनुसूचित जमातीच्या (Scheduled Tribe) व्यक्तीसाठी आरक्षित ठेवलेल्या गाळे निवासस्थाना करीता जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता आहे. सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी अनुसूचित जमाती या प्रवर्गात मोडत असलयाबाबतचे सक्षम प्राधिका-याने दिलेले जमात वैधता (Tribes Validity Certificate) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.तसेच सदर प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी अहवाल संबंधित समितीद्वारे प्राप्त झाल्यानंतर अर्जदारांना प्रत्येक्ष सदनिकेचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

10. सोडत प्रक्रीयेसाठी अर्जदारांना प्रवर्गातील कागदपत्र/दाखले/पुरावे मिळण्यासाठी विलंब लागण्याची शक्यता गृहीत धरुन स्वातंत्र्य सैनिक अथवा स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असलेले वारस (Next-to Kin), कलाकार व अनुसूचित जाती नवबौध्दांसह, भटक्या जमाती,विमुक्त जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना सदरचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. अर्जदारांना सदरचे प्रमाणपत्र विहित मुदतीमध्ये सादर करणे बंधन कारक आहे. यानंतरच अर्जदारास सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.तसेच अर्जदार उपरोक्त कागदपत्र/दाखले/पुरावे विहीत मुदतीमध्ये सादर करु न शकल्यास त्यांचे सदनिका वितरण कोणत्याही टप्यावर पुर्व सूचना न देता रदद करण्यात येईल व अर्जदाराने भरणा केलेल्या रक्कमेतुन सदनिकेच्या किंमतीच्या 1% एवढी रक्कम समपहरण (Forfeit) करुन उर्वरित रक्कम विना व्याज अर्जदाराच्या बॅंक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

11. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थीना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम 1981 ,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम 1981 च्या तरतुदी वेळोवेळी होणा-या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

12. गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. प्रआयो.2016/प्र.क्र.45/गृनिधो-2 दिनांक 18 ऑगस्ट, 2016 अन्वये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यास देण्यात येणा-या सदनिकांची पुनर्विक्री सदनिकेचा ताबा मिळाल्यापासून 10 वर्ष करता येणार नाही.

13 .अर्जदार किंवा त्याचे पती / पत्नी व अविवाहीत मुले यांचे नावे भारतात कुठेही पक्के घर नसावे.

14. सोडतीमधील यशस्वी अर्जदारांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नोंदणी असणे अथवा नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या अर्जदारांची नोंदणी झालेली नाही अशा अर्जदारांची नोंदणीची प्रक्रीया मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेद्वारे नोंदणी करण्याची तजविज करण्यात येणार आहे त्या करिता नियमानुसार लागणारे शुल्क विजेत्या लाभधारकास भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

15. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणा-या सदनिकांसाठी अर्जदार, कुटूंबामध्ये पती-पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल (विवाहीत अथवा अविवाहीत सज्ञान कमविती व्यक्ती हे स्वंतत्र कुटूंब म्हणून ग्राहय धरण्यात येईल) तसेच सदनिकांसाठी कुटूंबांतील कर्त्या महिलेच्या किंवा कुटूंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावे वितरण करण्यात येईल.

Signature Not Verified
Rajendra Gangadhar
Gaikwad
Dy.CO (Marketing)/MB

16. अर्जदारांने पुर्वी प्रधानमंत्री आवास योजना, क्रेडिट लिक्ड सबसिडी इत्यादी योजनेअंतर्गत लाभ घेतलेला नसावा अर्जदाराने असा कोणताही लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा सदनिकेचा ताबा दिल्यापश्चात अर्जदारावर कायदेशीर कार्यवाही करुन सदनिका ताब्यात घेण्यात येईल व भरणा केलेली संपुर्ण रक्कम विक्री समपहरण/ Forfeit केली जाईल.

17. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी / सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही.अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला मुंबई मंडळ/ म्हाडा जबाबदार राहणार नाही

आपला विश्वासू,

(राजेंद्र गायकवाड)
उपमुख्य अधिकारी/(पणन)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.

Signature Not Verified
Rajendra Gangadhar
Gaikwad
Dy.CO (Marketing)/MB

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

म्हाडा MHADA

# First installment Payment Receipt

## Application Details

| | |
|---|---|
| Application Number | 1130011342 |
| Lottery Name | MB-01 - PMAY |
| Scheme Name | 412 - 412-PAHADI GOREGAON, W MUMBAI- 104-EWS |
| Category Name | GP - General Public |
| Income Group Name | EWS - ECONOMICALLY WEAKER SECTION |
| PAN | BFDPN0367J |
| Applicant Name | AKSHATA NIVRUTTI NALAVDE |

| Transaction Id | Payment Date | Payment Amount |
|---|---|---|
| 191023123000293082 | 2023-10-19 01:10:12.983 | 751000 |

Nalavde

This is computer generated receipt and Subject to realization of Online transaction.

# स्विकृती पत्र

अर्जदारांचे नाव- AKSHATA NIVRUTTI NALAVDE

पत्ता - D/O NIVRUTTI NALAVDE BUILDING NO 2C, FLAT NO 105, NEW MHADA COLONY SADHU T.L.VASWANI ROAD, CUFFE PARADE MUMBAI MUMBAI CITY MAHARASHTRA 400005

प्रति,

उपमुख्य अधिकारी (पणन),

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,

मुंबई

विषय - मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सोडत -2023 स्विकृती पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मुंबई मंडळाची सोडत-2023 योजनेतील यशस्वी/प्रतिक्षायादीवरील यशस्वी अर्जदार असून जाहीरातीमधील व सोडतीच्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेल्या माहीतीपुस्तिकेमधील सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम 1981 , महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम 1981 च्या तरतुदी व त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणांसह जशाच्या तशा व संपूर्णपणे माझ्यावर बंधनकारक व मान्य राहतील. तरी मी खालील नमूद तक्यातील सदनिकेसाठी मी स्विकृती पत्र सादर करत आहे.

| सोडत | अर्ज क्र. | संकेत क. | योजनेचे नाव | सदनिका क्र. | प्रवर्ग | प्राधान्य |
|---|---|---|---|---|---|---|
| MB-01 PMAY | 1130011342 | 412 | 412-PAHADI GOREGAON, W MUMBAI- 104-EWS | 2-C-9-908 | GP | 162 |

सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर सादर केलेले कागदपत्र/पुरावे / दाखले मुळ प्रती पडताळणीसाठी मागणी केल्यास त्या तात्काळ कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात येईल. मुळ प्रती सादर करणे माझ्यावर बंधनकारक असेल त्यामध्ये कसुर केल्यास अथवा सादर केलेली कागद पत्र / पुरावे / दाखले बनावट किंवा माहीती चुकीची दिली असल्याचे निदर्शनास आल्यास सदनिका वितरण कोणत्याही टप्प्यावर रदद् करण्यात यावे/ताबा देण्यात आलेली सदनिका मंडळाच्या ताब्यात घेण्यास तसेच कायदेशीर कार्यवाहीस पात्र असून भरणा केलेली संपुर्ण रक्कम समपहरण/ Forfeit करण्यास माझी हरकत नाही.

मी घोषित करतो/करते की, ही स्विकृती पुर्णपणे विना अटी व शर्ती मान्य आहे व याबाबत भविष्यात माझी त्याबाबत कोणतीही हरकत/तक्रार असणार नाही.

आपला विश्वासू,

दिनांक :- 18/08/2023

(स्वाक्षरी)

AKSHATA NIVRUTTI NALAVDE

Nalavde

Digitally Signed by:
Name:AKSHATA NIVRUTTI NALAVDE
Date:Fri Aug 18 20:50:27 IST 2023